ISSN–2277- 8721

Electronic International Interdisciplinary Research Journal

EIIRJ

Volume–XI, Special Issue– I

Nov – Dec 2022

OPEN ACCESS

Original Research Article

# नवीन शैक्षणिक धोरण: मूल्यशिक्षण व तत्त्वज्ञानाची प्रासंगिकता

* डॉ. शुभदा जोशी,

* प्राध्यापक निवृत्त, तत्त्वज्ञान विभाग, मुंबई विद्यापीठ

**सारांश :**

*साधारणतः खालील मुद्द्यांच्या आधारे विषय मांडणी केलेली आहे.*

*१) नवीन शैक्षणिक धोरण - मूल्यशिक्षणविषयक दूरदृष्टी*

*२) भारतीय तत्त्वज्ञानाचे स्रोत आणि मूल्य विचारांचे स्रोत.*

*३) प्रामुख्याने मूल्यशिक्षणांतर्गत काय शिकवावे ?*

*४) कसे शिकवावे - तत्त्वज्ञानाचा उपयोग कसा करता येईल?*

**Copyright © 2022 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

आपण सर्वांनी नवीन शैक्षणिक धोरणाविषयी सविस्तर ऐकले आहे. स्वतंत्रपणे आपण वाचले ही असणार, त्यामुळे येथे फक्त मूल्यशिक्षणाच्या दृष्टीने जे महत्त्वाचे मुद्दे ' नवीन शैक्षणिक धोरणाची दूरदृष्टी ' यामध्ये मांडले आहेत त्यांचा निर्देश करते. या मांडणीमध्ये खालील मुद्यांचा उल्लेख आणि खुलासा केला आहे.

१) मूल्यशिक्षणाबद्दलचा विचार, आखणी, प्रत्यक्ष शिकवणे इ. भारतीय मूल्याधारित विचारधारेमध्ये विकसित झालेले असावे.

२) सर्वांना उच्च गुणवत्तेचे शिक्षण, नैतिक मूल्यशिक्षणासह मिळावे आणि दिले जावे.

३) भारतीय समाजाचे शाश्वत परिवर्तन न्याय्य आणि चैतन्यमय 'ज्ञान-समाजात' करणे हे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे.

४) भारताला जागतिक ज्ञान महासत्ता बनवणे हेही एक उद्दिष्ट आहे.

५) नवीन शिक्षण धोरण विद्यार्थ्यांमध्ये - (१) मूलभूत कर्तव्ये, (२) घटनात्मक मूल्यांविषयी पराकोटीचा आदर, (३) 'स्व'देशाशी दृढ नाते आणि (४) बदलत्या जगातील स्वतःच्या भूमिका आणि जबाबदार्यांविषयी जागरूकता निर्माण करणारे हवे.

६) या शिक्षणाने मूल्यविचार व्यवहारात, कृतीत रुजवणे आवश्यक आहे.

७) मानवी हक्क, शाश्वत विकास आणि जीवनमान यांना अनुकूल, यांच्याशी बांधिलकी असणारे ज्ञान, कौशल्ये, मूल्ये ही विकसित करणे अतिशय महत्त्वाचे आहे.

मूल्यशिक्षणाबद्दलचा विचार, आखणी आणि प्रत्यक्ष शिकवणे यातील पहिल्या दोन गोष्टींचे प्रत्यक्ष रूप नवीन शैक्षणिक धोरणात मांडलेले आहे. मूल्यशिक्षण प्रत्यक्ष शिकवण्यासाठी काय करावे लागेल आणि याचे भारतीय तत्त्वज्ञानाशी नाते काय आहे याचा विचार 'शिक्षक प्रशिक्षण' म्हणजे शिक्षकांना शिकवणे, तयार करणे, मार्गदर्शन करणे, यासाठी केला पाहिजे.

ISSN–2277- 8721

Electronic International Interdisciplinary Research Journal

EIIRJ

Volume–XI, Special Issue– I Nov – Dec 2022

OPEN ACCESS Original Research Article

भारतीय मूल्याधारित विचारधारेची धाराप्रवाही अक्षुण्ण धारा प्राचीन काळापासून प्रवाही आहे. वेद-उपनिषदे-गीता, मध्ययुगीन संतांच्या रचना, भागवत, भगवद्गीता यासारख्या प्राचीन ग्रंथावरील प्रांतोप्रांतीच्या भाषेत केलेली मांडणी, रामायण, महाभारत यांच्यावरील लेखन यामुळे मध्ययुगीन भारतात मूल्याधारित जीवन पद्धती अखंडितपणे चालू राहिली. इंग्रजी अंमलाच्या काळातही विविध भारतीय भाषेत विशेषतः महाराष्ट्र, बंगाल आणि मद्रास येथे अनेक व्यासंगी समाजधुरीणांनी प्राचीन परंपरांचा 'अर्वाचीन' संदर्भात विचार केला. उदा. महाराष्ट्रातील विचारवंतांचे लेखन. (न्या. महादेव गोविंद रानडे, लोकमान्य टिळक, समाजसुधारक आगरकर, घटनाकार डा. बाबासाहेब आंबेडकर इ.)

नवीन शिक्षण धोरणात मूल्यविचारांचा स्रोत 'भारतीय' असावा असे म्हटले आहे, यामध्ये स्वातंत्र्योत्तर काळात बनवलेली स्वतंत्र भारताची घटना, त्यामध्ये मांडलेली नागरिकांची कर्तव्ये यांचाही समावेश होतो. नागरिक हक्कांबद्दल आपण बर्यापैकी जागरूक असतो. हक्कांची पायमल्ली झाली तर न्यायव्यवस्थेकडून न्याय मिळवण्यासाठी भांडता येते, अनेकदा आपण भांडतोही. परंतु नागरिक-कर्तव्यांचा निर्देश ज्या पुस्तकामध्ये मध्ये केला आहे त्याचे पालन करणे कित्येकदा सोयीस्करीत्या विसरले जाते. नवीन शिक्षण धोरणांनुसार याबद्दलची जागृती व्हावी ही अपेक्षा आहे. कारण त्यामुळे सुजाण आणि संवेदनशील नागरिक घडवण्यामध्ये मदत होईल. भारतीय परंपरा केवळ तत्त्वज्ञानात्मक मांडणीतून मूल्य विचार देते असे नाही, तर भारतीय चित्रकला, नृत्यकला, गायनकला, नाट्यकला, चित्रपट यासारख्या अनेक कलाही मूल्य विचार व्यक्त करतात.

मूल्यशिक्षणाबद्दलची आखणी हा पुढचा महत्त्वाचा टप्पा. यासाठी देशभरात राज्यपातळीवर आणि केंद्रीय पातळीवर याबद्दल विचार करण्यासाठी समित्यांचे गठण करण्यात आले, या समित्यांचे अहवाल त्या-त्या राज्यांना आणि केंद्राला सादरही झाले. या संस्थांना हे अहवाल सुपूर्द होऊन, त्याची कार्यवाही होऊ लागेल असे आता दिसते. तेव्हा मूल्यविचारांबद्दल काय आणि कसे शिकवावे हा अत्यंत महत्त्वाचा भाग, याबद्दलचा विचार गरजेचा आहे.

भारतीय विचार परंपरेमध्ये मूल्यांचा उद्देश 'मानवी जीवनासाठी' फार महत्त्वाचा मानला आहे. मानव म्हणजे नर हा दानव किंवा 'असुर' आणि देव किंवा 'सुर' यांच्यामध्ये जणू उंबरठ्यासारखा आहे असे विनोबाजींनी म्हटले. नराचा असुर होणे म्हणजे मूल्याधारित जगणे टाकून किंवा तत्त्वज्ञानाच्या भाषेत सात्विक वृत्ती टाकून तामसी, मूढ वृत्तीने वागणे. याउलट सद्गुण संपादन आणि त्यानुसार वर्तन म्हणजे 'नरा'चा 'सुर' किंवा मनुष्याचा देवमाणूस होणे. भारतीय दर्शने, तत्त्वज्ञानाचे स्रोत असे सांगतात की हे उन्नयन फक्त मनुष्यजन्मातच शक्य आहे, इतर कोणत्याही योनितील जन्मात असे उन्नयन शक्य नाही म्हणून मनुष्य जन्म मिळणे भाग्याचे आणि त्याचे सार्थक करण्यासाठी सद्गुण संपादन करून तसे वागणे हेही महत्त्वाचे आहे. हे संतत्त्वाचे द्योतक. मोक्ष यांच्या (संतांच्या) पायाशी लोळण घेतो तरीही लोककल्याणासाठी संत या मोक्षालाही जवळ येऊ येत नाहीत. (पैरोते सर म्हणती - ज्ञानेश्वर).

मूल्यविचार केवळ व्यक्तिगत उन्नयनासाठी, प्रगतीसाठी नाही, भारतीय विचारपरंपरा ही व्यक्तीची सामाजिक बांधिलकी फार घट्टपणे मांडते. या विचारांची स्पष्ट मांडणी 'ऋत', 'ऋण', 'पुरुषार्थ', 'आश्रम' या प्राचीन भारतीय संकल्पनांच्या मांडणीत दिसते. ही सारी मूल्ये

ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– I Nov – Dec 2022

OPEN ACCESS Original Research Article

'धर्म' या संकल्पनेचा भाग म्हणूनही व्यक्त होतात. 'इह', 'पर', 'वैयक्तिक-सामाजिक', 'राष्ट्रीय', 'मानवतावादी' यांसारखी कर्तव्ये व्यक्तिधर्म, समाजधर्म, राष्ट्रधर्म, मानवधर्म इ. नावांनी निर्देशित केली जातात.

नवीन शैक्षणिक धोरणानुसार जी मूल्ये शिकवायची त्यामध्ये शारीरिक, बौद्धिक, भावनिक किंवा मानसिक या मूल्यांबरोबरच, प्रत्येक सामाजिक संस्थेबद्दलची मूल्ये शिकवणे आवश्यक झाले आहे. या महत्त्वाच्या सामाजिक संस्था ज्यांचे वर्णन ज्ञानेश्वरांनी 'सकल लोकसंस्था रक्षणीया ह्या सर्वथा' कारण त्या 'धर्माचे माहेर' आहेत असे केले आहे. स्वस्थ, निरोगी समाजासाठी विवाह संस्था, कुटुंब संस्था, उत्पादन क्रय-विक्रय आर्थिक संबंधातील संस्था, शिक्षण संस्था, शासन संस्था आणि त्या अंतर्गत येणार्या संस्था यांच्याबद्दलच्या जबाबदार्या, कर्तव्ये, त्यांची जपणूक हेही होणे सुसंस्कृत नागरिक समाज निर्माण होण्यासाठी गरजेचे आहे. त्यामुळे काय शिकवावे याचा विचार करताना सामाजिक भान आणि जबाबदार्यांची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये रुजवणे आवश्यक आहे. आपल्या समाजाची याबाबतीतील सद्यःकालीन उदासीनता नुसती मन विषण्ण करणारी नाही, तर भयावह सुद्धा आहे. आमच्या सांस्कृतिक, वैचारिक वारशाचे नुसते जतन करून पुरेसे नाही, तर त्याप्रमाणे वैयक्तिक, सामाजिक आचरण होणे गरजेचे आहे.

मूल्य विचारांचा भारतीय स्रोत, त्याची आवश्यकता हे मांडले तरी हे विद्यार्थ्यांपर्यंत पोचवायचे कसे हा अतिशय महत्त्वाचा कळीचा मुद्दा शिल्लक राहतो. मूल्य विचार आणि मूल्यशिक्षण द्यावे कसे? कारण हा पाठ्यक्रम, पाठ्यपुस्तक, परीक्षा इ. असलेला विषय नाही, तरीही तो अतिशय महत्त्वाचा आहे. सर्व शालेय विषय शिकवताना शिक्षकांनी मूल्य-विचार विद्यार्थ्यांपुढे ठेवावा, त्यांना विचार आणि कृती करायला प्रोत्साहन द्यावे असा विचार या 'नवीन शिक्षण धोरणात' आहे. भाषा विषय, तसेच कलाविषय, शास्त्र, गणित इ. विषय शिकवताना शिक्षकांनी भावनिक, मानसिक, सौंदर्य विषयक मूल्ये, तसेच विचारांबद्दलची तार्किक मूल्ये इ. शिकवावी अशी अपेक्षा आहे. भाषा आणि इतिहास विषयाद्वारे भारतीय परंपरा, सणवार, जनजीवन, मूल्यविचार यांची ओळख करून देणे तुलनेने सोपे असेल, पण विज्ञान आणि गणित शिकवताना 'तर्काधिष्ठित विचारांचे मूल्य' प्रभावीपणे मांडणे शालेय शिक्षणाच्या ८ वी ते १२ वी या पातळीवर शक्य होऊ शकेल.

कलांच्या अभ्यासामुळे उदा. चित्रकला, संगीत, नृत्य, नाट्य, शिवणकला यामुळे व्यक्ती - विद्यार्थी संवेदनशील बनवणे हे उद्दिष्ट असले पाहिजे. वैज्ञानिक दृष्टी, सारासार विचार, तार्किकता म्हणजे कोरडे, भावनारहित, बोथट होणे नव्हे, तर अधिक संवेदनशील होणे आहे हे सांगणे जरुरी आहे, हे नवीन शैक्षणिक धोरणाने अधोरेखित केले आहे.

कसे शिकवावे? याच्या उत्तरामध्ये 'शिक्षकांचे प्रशिक्षण' हा अत्यंत महत्त्वाचा भाग येतो. शिक्षक प्रशिक्षणासाठी वर्गांचे आयोजन करणे, त्यासाठी तत्त्वज्ञानाच्या अभ्यासकांना मार्गदर्शन करायला बोलावणे, तसेच शिक्षकांच्या अभ्यासक्रमामध्ये 'मूल्यशिक्षण' हा विषय अंतर्भूत करून किमान काही व्याख्यानांसाठी तत्त्वज्ञानाच्या, त्यातही भारतीय तत्त्वज्ञानाच्या अभ्यासकांना बोलावणे अगत्याचे आणि आवश्यक असावे. शिक्षकांचे प्रबोधन तसेच पालकांचे, शाळाचालकांचेही प्रबोधन आवश्यक आहे यासाठी तत्त्वज्ञानाच्या अभ्यासकांनी, शिक्षकांनी जरूर पुढाकार घ्यावा. शिक्षकांच्या प्रबोधन शिबिरांमध्ये ऋत, ऋण, पुरुषार्थ, आश्रम, विविध धर्म (कर्तव्ये),

निष्काम कर्म यांसारख्या महत्त्वाच्या संकल्पनांचा यथार्थ विचारविनिमय व्हावा. याचबरोबर भारतीय इतिहासातील गौरवशाली आचार्य परंपरा, प्राचीन भारताचे ज्ञानाच्या जगातील योगदान याच्याबद्दलची माहिती शिक्षक व पालकांना देणे आवश्यक आहे. शिक्षक-पालक-शाळाचालक यांचे उद्दिष्ट चरित्र निर्माण, व्यक्तिमत्त्व विकास, मूल्याधारित पाठ्यक्रम तयार करणे व त्याची अंमलबजावणी करणे हे असले पाहिजे. पालकांसाठी मूल्यशिक्षण अधिक सखोलपणे करणे शक्य असून, ते करणे गरजेचे सुद्धा आहे. नवीन शैक्षणिक धोरणानुसार शिक्षित व्यक्तीने उत्तम रीतीने आर्थिकदृष्ट्या संपन्न व्हावे एवढे संकुचित ध्येय ठेवू नये, हा विचार ठामपणे मांडला आहे.

केंद्रीय विद्यालय जनकपूरी येथील दिल्लीच्या शाळेत पालकांबरोबर अशी चर्चा झाली. त्यांच्या चर्चेत असे दिसले की सर्व पालकांच्या मते आपल्या पाल्याने उत्तम पैसा कमावणारे शिक्षण घ्यावे, आज महाराष्ट्रात, किंबहुना सर्व भारतात हेच चित्र सार्वत्रिक आहे. शिकणार्या आपल्या मुलांनी पैसा मिळवून श्रीमंत होता येईल असे शिक्षण घ्यावे असे पालकांना वाटते. त्याचे परिणाम आपण अनुभवतोच आहोत. पालकांना हे शिकवणे गरजेचे आहे की तुमची दृष्टी बदला, मुलांना पैसा मिळवून श्रीमंत व्हा असे शिकवू नका, तर त्यांना वस्तूंची, वेळेची, माणसांची किंमत, मूल्य शिकवण शिकवण. ( मुळात हे पालकांनी पण शिकले पाहिजे). चरित्र निर्माण यासाठी विद्यार्थ्यांना विविध पुस्तके उपलब्ध करून देणे, वाचनालय, पुस्तकालय सुविधा पुरवणे हेही महत्त्वाचे आहे. विविध उपक्रमांची आखणी आणि त्याची कार्यवाही शिक्षक, विद्याथीर्, प्रशासन, पालक सर्वांनी मिळून केल्यास शिक्षकांवर अतिरिक्त भार पडणार नाही आणि शिक्षणाशी संबंधित सर्व घटकांचा या उपक्रमांमध्ये सहभाग असेल. या उपक्रमांच्या अंतर्गत वाद स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, चर्चा, काव्य, संगीत, नाट्य, चित्रकला विषयकही विविध स्पर्धांचे आयोजन करणे विद्यार्थ्यांना मूल्य विचार समजण्यासाठी, उमजण्यासाठी, पटण्यासाठी महत्त्वाचे आहे.

अशा स्पर्धांमध्ये भाग घेतल्याने विद्यार्थ्यांना सामुदायिक सहकार्याने काम करणे, हार-जीत सन्मानाने स्वीकारणे इ. शिक्षण मिUते. विद्यार्थ्यांना सामुदायिक सहकार्य आणि शारीरिक, मानसिक, अध्यात्मिक विचार - कृतींचा वारसा शिकवण्याचे एक महत्त्वाचे अंग म्हणजे योग शिक्षणाचा शालेय शिक्षणात समावेश. योग ही केवळ शारीरिक कसरत, नैपुण्य, प्राविण्य एवढ्यापुरती मर्यादित असणारी विचार - जीवनपद्धती नाही. शरीराबरोबरच मनाला वळण लावणार्या आसनांबरोबर किंवा आसनांच्याही आधी येणारी 'यम-नियम' ही योगाङ्गे मूल्यशिक्षणाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची आहेत. याबद्दल तत्त्वज्ञानाचे अभ्यासक योग्य मार्गदर्शन शिक्षक, पालक, शाळाचालक, विद्यार्थी यांना करू शकतील. यम-नियमांची योग्य मांडणी शालेय पातळीच्या विद्यार्थ्यांना आवडेल, कळेल, रुचेल अशा रीतीने करणे हेही उपयुक्त ठरेल. आसने आणि प्राणायामाबद्दलचे योग्य, सोपे मार्गदर्शन तज्ञ शिक्षकांनी करणे फायद्याचे ठरेल. संपूर्ण आयुष्याला मार्गदर्शक ठरणारा 'योग' हा तत्त्वज्ञानात्मक मूल्य विचार प्रभावीपणे मांडणारा आहे. योग शिक्षणामुळे शरीर स्वास्थ्य, एकाग्रता, ताणतणावांपासून शक्यतो लांब रहायला शिकणे हेही विद्यार्थ्यांना शिकवता येईल. मूल्यविचार केवळ मानसिक नाही, तर शरीर हे आद्य धर्मसाधन आहे हा विचार या पाठीमागे आहे. सूर्यनमस्कार, ओंकार ध्यान, शवासनाचा सराव इ. चा फायदा उत्तम शरीर,

ISSN–2277- 8721

Electronic International Interdisciplinary Research Journal

EIIRJ

Volume–XI, Special Issue– I

Nov – Dec 2022

OPEN ACCESS

Original Research Article

स्वस्थ मन, चांगले विचार घडवण्यासाठी होतो. शाळेतील सकाळची सामुदायिक प्रार्थना, श्लोक पठण हेही महत्त्वाचे आहे. शिक्षकांनी पंचकोषाची माहिती विद्यार्थ्यांना द्यावी. ही माहिती शिक्षकांना तत्त्वज्ञानाच्या शिक्षकांनी, अभ्यासकांनी जरूर सांगावी. या पंचकोषातील प्राणांबद्दल उपनिषदातील कथा विद्यार्थ्यांना जरूर सांगता येतील.

मूल्याधारित शिक्षण, केवळ पैसा मिळवणे हे ध्येय नव्हे याचा अर्थ पैसा मिळवणे महत्त्वाचे नाही असा होत नाही. प्राचीन भारतीय साम्रज्ये, मध्ययुगीन काळातही संपन्न समाज, पुरुषार्थामध्ये धर्माइतकेच अर्थ-कामाचे महत्त्व, गृहस्थाश्रमातील गृहस्थाने 'जोडोनि धन उत्तम व्यवहारे उदास विचारे वेच करावे' हा विचार हे सर्व ८ वी ते १२ वी मधील विद्यार्थ्यांना इतिहास शिकवताना, भाषेमध्ये संतांची शिकवण शिकवताना प्रभावीपणे शिकवता येऊ शकेल.

शरीराचा उपयोग केवळ उपभोगांसाठी आहे का? असा प्रश्नही ८ वी ते १२ वी च्या विद्यार्थ्यांना करता येईल. शरीर-संस्था शिकवताना, पुनरूत्पादन संस्था शिकवताना, शरीराचे महत्त्व, पुनरूत्पादन म्हणजे नवीन मानवी आयुष्याची जबाबदारी घेणे आहे हे शिकवणे जरूरी आहे. सध्याच्या काळात शालेय विद्यार्थी - विद्यार्थिनी 'वयात येणे' हे जरा पूर्वीपेक्षा लवकर शारीरिक आणि त्याही पेक्षा भावनिक, त्यातही उपभोग भावनेने झपाटल्याने १२ ते १४ वर्षांच्या मुलामुलींनाही बेचैन करते. दूरदर्शन, चित्रपट यांसारख्यांचा परिणामही त्यास हातभार लावतो. त्यामुळे शरीराच्या सहाय्याने सुखोपभोग, त्याच्या मर्यादा, त्याच्या बरोबरीने येणार्या जबाबदार्या यांचे भान विद्यार्थ्यांना करून देणे फार गरजेचे झाले आहे. भारतीय मूल्य विचाराने कायम उपभोगापेक्षा संयम, त्याग आणि जबाबदारी जास्त महत्त्वाची मानली आहे.

'जागरुक नागरिक' कार्यक्रमासारखे कार्यक्रम केंद्रीय विद्यालय दिल्ली यांनी रामकृष्ण मिशनच्या मदतीने २०१४ साली इयत्ता ७ वी ते ९ वी च्या विद्यार्थ्यांसाठी राबवला होता. यापासून प्रेरणा घेऊन विविध ठिकाणच्या स्थानिक रामकृष्ण मिशन, त्याचबरोबर विवेकानंद केंद्र शाखांच्या सहकार्याने, तसेच तत्त्वज्ञानाच्या अभ्यासकांच्या मदतीने करता येणे शक्य आहे. 'मुष्टि धान्य योजना' म्हणजे दर महिन्याला मूठभर धान्य (एकाच प्रकारचे एका महिन्यात) प्रत्येक विद्यार्थी, शिक्षक – शाळा चालकांनी आणून त्याचे एकत्रिकरण करून त्याची पूजा करून ते धान्य प्रसाद म्हणून गरजू कुटुंबांना, विद्यार्थ्यांना वाटण्याचा परोपकाराचा संस्कार विद्यार्थ्यांवर करता येतो. विद्यार्थ्यांना पंच ज्ञानेंद्रिये याबरोबर पंचमहाभूते, निसर्गचक्र, त्याची परस्परावलंबित्वता, निसर्गाचा समतोल राखतानाच निसर्ग संवर्धनाची जबाबदारी पार पाडणारी माणसे असणे जरुरीचे असते. शास्त्र /विज्ञान शिकवणारे शिक्षक निसर्गचक्राचे महत्त्व, त्याचा समतोल, वृक्षांचे महत्त्व, अनावश्यक वृक्षतोड टाळणे यासारख्या करण्यास जरुरी किंवा जरुरी नाही अशा प्रकारच्या कृतीशील गोष्टी शिकवू शकतील.

**ऋत कल्पनेचा खुलासा:**

पर्यावरण रक्षण, त्याचा अभ्यास शिकवणार्यांसाठी 'ऋत' या वैदिक संकल्पनेचा सोपा खुलासा तत्त्वज्ञानाचे अभ्यासक करू शकतील. ऋत याचा सोपा अर्थ म्हणजे निसर्गातील परस्परावलंबी चक्राकार रचना. या चक्राकार रचनेचे सातत्य अबाधित राखणे, म्हणजे

ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– I Nov – Dec 2022

OPEN ACCESS Original Research Article

निसर्गाचा समतोल राखणे, ऋताचे पालन करणे. उदा. प्राणवायूचे किंवा कार्बन-डाय-आक्साइडचे चक्र. मनुष्य दिवस-रात्र प्राणवायू वर जगतो, पण वनस्पती दिवसा सूर्यप्रकाशात कार्बन डाय आक्साइड शोषून अन्न तयार करतात आणि प्राणवायू हवेत सोडतात. हे परस्परावलंबित्व निसर्गाचा समतोल राखते आणि माणसाला जगण्यासाठी सतत प्राणवायू पुरवते. असेच चक्र पाण्याचे, पावसाचे, ऋतूंचे, वन्यजीव, छोटे प्राणी, माणसे यांच्याही विविध नात्यांचे असते. निसर्गातील इतर कोणतेही जीव या प्रकारच्या चक्राचे भेदन करून ऋताविरुद्ध पालन करू शकत नाहीत. पण माणूस आपल्या बुद्धिचा, विचारांचा स्वार्थीपणाने उपयोग करून, उपभोग लालसेने निसर्गचक्रांचा नाश करतो, म्हणून माणसाला ऋताचे, सद्गुणांचे पालन करावे असे सांगितले. स्वार्थ, लालसा यापेक्षा माणसाने मैत्री, करुणा, मुदिता, उपेक्षा यांचे आचरण करावे या बुद्धांच्या शिकवणुकीचा अर्थही येथे शिक्षकांना सांगून शिकणार्या मुलांपर्यंत तो पोचवता येईल.

ऋत कल्पनेप्रमाणेच 'ऋण' संकल्पना महत्त्वाची आहे. मातृपितृ ऋण विवाह संस्थेचा आणि कुटुंब संस्थेचा पाया आहे, ऋषी ऋण हा शिकवणे-शिकणे या शिक्षण संस्थेचा पाया आणि ज्ञानाच्या जगाची निर्मिती किती महत्त्वाची आहे हे सांगणारा अतिप्राचीन विचार आहे, तर देव ऋण त्यागाचे महत्त्व सांगणारा, कमावलेले सर्व स्वतःसाठीच नाही, तर इतरांसाठीही आहे हे सांगणारा, त्याग, दान, सेवा यासारख्या जीवनमूल्यांचा पाया आणि 'यज्ञ' संस्थेचा वैचारिक आधार आहे. अशा महत्त्वाच्या संकल्पना प्राचीन सांस्कृतिक धरोहर आहेत, त्याचे ज्ञान शालेय शिक्षकांना आपण करून देणे आवश्यक आहे. ऋत, ऋण, आश्रम, पुरुषार्थ या सर्व भारतीय प्राचीन संस्कृतीचा वैचारिक ठेवा आहे, त्याची माहिती शिक्षक-विद्यार्थी-पालक-शाळाचालक सर्वांना झाली तर त्यांच्यामध्येही काही चांगले बदल घडून येतील.निसर्ग अभ्यास मंडळ, पर्यावरण अभ्यास मंडळ किंवा गट स्थापन करून शाळेजवळील परिसराचा विकास विद्यार्थी - शिक्षक - पालक - शाळाचालक सर्वांना करता येईल. त्यामध्ये निसर्ग संवर्धनाला पोषक बदल घडविता येतील. यासाठी स्थानिक समाज संस्थांची मदत घेऊन विद्यार्थ्यांना समाजामध्ये काम करण्याचे वस्तुपाठ देता येतील.

प्रबोधन शिबिरांचे आयोजन करून विविध सण, उत्सव महत्त्वाच्या महनीय नेत्यांच्या जयंती, पुण्यतिथी, त्यांच्या उत्तुंग व्यक्तिमत्त्व व कार्याची माहिती विद्यार्थ्यांना देता येईल. प्रबोधन शिबिरांचा भाग म्हणून इतिहास - भूगोल शिकवताना 'क्षेत्रीय भेटीं'चे आयोजन करता येईल. शाळेच्या परिसराच्या जवळपास असणारी ऐतिहासिक, सांस्कृतिक, भौगोलिक, औद्योगिक महत्त्वाची ठिकाणे विद्यार्थ्यांना माहितीपूर्ण रीतीने अनुभवू देणे हेही महत्त्वाचे मूल्यशिक्षण आहे.सेवा, स्वच्छता, शांती, सहिष्णुता, सहनशीलता, वडिलधार्यांचा आदर, सहानुभूती, करुणा इ. वर्णन केलेल्या मूल्यांचे शिक्षण, आचरण, विवेचन इ. प्रबोधन शिबिरातून, तसेच भाषा, इतिहास यांसारख्या विषयातून देता येईल.

संविधानात्मक मूल्ये शिकवणे आणि सुजाण, संवेदनशील कृतीप्रवण जागरूक नागरिक बनवणे यासाठी विविध राष्ट्रीय सण शाळेत साजरे करणे, स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन, विविध सामाजिक - राजकीय महत्त्वाच्या व्यक्तींबद्दल माहितीही देता येईल. राजस्थानमधील एका शाळेच्या इतिहासाच्या शिक्षकांनी चौथी इयत्तेच्या विद्यार्थ्यांना स्थानिक महत्त्वाच्या व्यक्तींची माहिती गोळा

करायला सांगितली. त्यासाठी कुटुंबातील ज्येष्ठ व्यक्तींशी (आजी-आजोबा-आई-वडील इ.) संवाद साधून माहिती मिळवायला सांगितली आणि विद्यार्थ्यांनी स्थानिक इतिहास तयार केला. यामुळे स्थानिकांबद्दल सर्वांना माहिती मिळाली, स्थानिकांचा सन्मान झाला, तसेच घरातील ज्येष्ठांबरोबर लहान मुलांचे वैचारिक आदान-प्रदानाचे भावबंध निर्माण झाले.

विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व, पुस्तकांचे महत्त्व जाणवून देणे, पुस्तकांमुळे मिळणारे जीवन, शिक्षण महत्त्वाचे आहे हा संस्कार त्यांच्यामध्ये रुजवणे हे फार आवश्यक आहे. लोकमान्य टिळकांचा ग्रंथ संग्रह खूप मोठा होता, त्यांना ग्रंथाबद्दल अपार आदर होता. त्यांचे म्हणणे होते की, ग्रंथ हे फार सहृदय शिक्षक आहेत, कारण ते तुमच्या चुकांना हसत नाहीत. पुस्तके वाचून, माहिती मिळवून आपले मत, आचरण ठरवणे हा महत्त्वाचा भाव चांगले व्यक्तिमत्त्व घडवतो. त्यामुळे शाळेत उत्तम ग्रंथालय। पुस्तकालय असणे, ते विद्यार्थ्यांना उपलब्ध असणे आवश्यक आहे. जालोरमधील (राजस्थान) विद्यालयात पुस्तक दीर्घिका तयार केली आहे, त्या दीर्घिकेमध्ये विद्यार्थी पुस्तके हाताळू शकतात, चाचपुन पाहू शकतात. अशाच प्रकारे शाळेत 'मूल्य-कोपरा' ही, मूल्यात्मक विचारांचे भिंतीवर प्रदर्शन यासारख्या महत्त्वाच्या कार्यक्रमांचे आयोजनही त्या शाळेत केले. 'भारत दर्शन गलियारा' प्राचीन, अर्वाचीन गौरवशाली परंपरांचे प्रदर्शन यासारखे उपक्रम जालोर जिल्ह्यातील शाळेमध्ये राबवले गेले, जे सर्वांना खूप आवडले. त्याचबरोबर भारतीय संगीत वाद्य, यंत्र संग्रहालय, भारतीय वेशभूषा दिन, चित्रकथा, रचना विविध कलाप्रकारांची माहिती देण्यासाठी करणे इ. विविध कार्यक्रम राबवले गेले जे अन्य शाळामध्येही राबवता येणे शक्य आहे.

मूल्य शिक्षणासाठी प्रत्यक्ष पद्धत किंवा अप्रत्यक्ष पद्धत यांचा वापर करता येतो. प्रत्यक्ष पद्धतीमध्ये सर्व प्रकारचे उपक्रम वर्गात, शाळेत, विद्यार्थी-शिक्षक सहभागाने राबवता येतात. त्यामध्ये शिकवणार्या मूल्यविचारांचा प्रत्यक्ष शिकवण्याशी संबंध असतो, तर अप्रत्यक्ष मूल्य शिक्षण हे समग्र अखंड, तुकड्याने न करता केले जाते. यामध्ये सर्व शालेय विषय, शालेय उपक्रम, उत्सव, कार्यक्रम, सभा, गटचर्चा इ. अनेक उपक्रमांचा समावेश करण्यात येतो. समग्र विद्यालयाच्या सहभाग दृष्टीचाही वापर करण्यात येतो. यामध्ये मूल्यविचारांचे समग्र शिक्षण, चर्चा, माहिती व अन्य विविध उपक्रमांचा समावेश होतो. सध्याच्या शिक्षणातील घोकंपट्टी आणि केवळ माहिती ज्ञान देणे, यावरील भर माणूसपणाच्या उन्नयनाशी घातलेली सांगड याबद्दलची माहिती विद्यार्थ्यांना देणे हे नक्कीच त्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाचे महत्त्वाचे अंग असेल.

माहिती-घोकंपट्टी इ. शिक्षणातून केवळ माहितीचे भांडार असलेला मानवी संगणक बनविण्याऐवजी चांगला माणूस घडवणारे शिक्षण, कृतीशील जबाबदार सद्वर्तनी नागरिक घडवणारे शिक्षण, समाजाप्रती आपले काही देणे आहे या समाजऋणाची शिकवण देणारे शिक्षण, सृजनशील, कल्पक, तर्कनिष्ठ, नैतिक विचार स्पष्ट करणारे शिक्षण हे उद्याच्या 'तरुण भारता'चे भवितव्य अधिक चांगले घडवू शकेल.

**Cite This Article:**

***डॉ. शुभदा जोशी,(2022***) नवीन शैक्षणिक धोरण: मूल्यशिक्षण व तत्त्वज्ञानाची प्रासंगिकता, ***Electronic International Interdisciplinary Research Journal***, *Volume No XI (Special Issue-I), 43-49.*